# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विजय माधवराव चिद्रे,<br>रा.निलंगा, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी ,जिल्हा परिषद ,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - डॉ. बोडके एन.डी., प्रशासन अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. पाटील. बी.ए.,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि २३.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ (त्यांच्या पत्नी) यांच्यासंदर्भात एकूण १३ मुद्यांवर दि. १५.०९.२००९ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना दि. २३.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती खास दुतामार्फत पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांना ती दि. २६.१०.२००९ रोजी मिळाली आहे. यासंदर्भात पोच जन माहिती अधिकारी

यांच्या दप्तरी उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे दि. २८.१०.२००९ रोजी मुद्दा क्र. १२ च्या संदर्भात माहिती पाठविण्यात आली आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०४.०१.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४,५,८ व ९ ची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी माहिती तयार होती. अपिलार्थीस ही माहिती पाठविण्यात आलेली आहे.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या दि. ०७.०४.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. तथापि त्यांना एकूण तीन मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, असे त्यांच्या द्वितीय अपील अर्जात नमूद केलेले आहे. आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना या बाबीची खातरजमा करावी लागेल व या तीन मुद्यांसंदर्भातील माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे स्तरावर अपील बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजय माधवराव चिद्रे, गगनविहार अपार्टमेंट, सी-१५,विशाल नगर,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.गायकवाड संजीवकुमार पंढरी, | : | अपिलार्थी |
| रा.जोगाळा, ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| मदरसा अनवारुल उलूम,उदगीर, जि. लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| धर्मादाय आयुक्त कार्यालय,लातूर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.गायकवाड संजीवकुमार पंढरी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, मदरसा अनवारुल उलूम शाळा,उदगीर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर - श्रीमती स्वाती पाडळकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मदरसा अनवारुल उलूम शाळा,उदगीर,जि.लातूर या शाळेच्या संदर्भात विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यामध्ये धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीपूर्व असलेले पावती बुक यांच्या सत्यप्रती व त्यांची संख्या,सादर केलेल्या घटनेची सत्यप्रत, सन २००७ ते ०९ पर्यंतचे केलेल्या लेखापरिक्षणाच्या सत्यप्रती, सन २००७ ते दि.०५.०८.२००९ पर्यंत

शाळेतील शिक्षक व रिक्त पदे याबाबतची माहिती, रुजू असलेले शिक्षक व त्यांचे शिक्षण आणि वेतनश्रेणीची माहिती मागितली आहे. ती त्यांना आतापर्यंत देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय झालेला नाही. या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांना आयोग जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घ्यावी. त्यावर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदरसा अनवारुल उलूम शाळा,उदगीर,जि.लातूर व अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलमानुसार माहिती देण्याचा निर्णय द्यावा. असा निर्णय घेतांना शाळेशी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदरसा अनवारुल उलूम शाळा,उदगीर,जि.लातूर यांच्याकडे सोपवावी लागेल व कलम 2(f) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होणारी आहे, ती माहिती जन अपिलीय अधिकारी यांना द्यावी लागेल.

यास्तव प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गायकवाड संजीवकुमार पंढरी, रा.जोगाळा, पो.लक्कडजवळगा,ता.शिरुर अनंतपाळ,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदरसा अनवारुल उलूम शाळा,जळकोट रोड,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतींसह) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११४२ | | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. | ०८-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९.०७.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०९.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११४३ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०७.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कुरे बालाजी माधवराव,<br>रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>सचिव,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११४८ | | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. | ०८-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १५.०१.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ५ | प्रथम अपील केल्याची तारीख | | निरंक |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.०७.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, रा.सताळा खुर्द,ता.अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | तालुका कृषी अधिकारी, कृषी कार्यालय ,पाथर्डी, जि.अहमदनगर | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | तालूका कृषी अधिकारी ,पाथर्डी,जि.अहमदनगर | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पाथर्डी, जिल्हा अहमदनगर - श्री. हरिभाऊ केशव फाजगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, पाथर्डी, जिल्हा अहमदनगर - श्री. बाळासाहेब संपतरव नितनवरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज त केल्याची तारीख | | दि. ०६.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.१२.२००९ मुंबई कार्यालयाकडे प्राप्त<br>दि.०२.०१.२०१० औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांच्याकडे दिनांक १५-१०-२००९ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, रा.सताळा खुर्द,ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,पाथर्डी, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,पाथर्डी,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनंत गोंविदराव पारसेवार, : अपिलार्थी
रा.उदगीर जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनंत गोंविदराव पारसेवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर- श्री. एम.जी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची संचिका गहाळ झाल्यामुळे त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही व त्या संचिकेचा शोध घेणे अद्यापही चालू आहे. संबंधित कर्मचाऱ्याकडून खुलासा मागितला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेली माहिती रॉकेल विक्रीच्या संदर्भात आहे व या संदर्भात अपिलार्थी व ॲड.दत्ता पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवर चौकशी होणे अपेक्षित होते व या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थी यांनी मागितली आहे. ती आतापर्यंत त्यांना प्राप्त झाली नाही.

आयोगापुढील युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध घेऊनही सापडत नाही ही गंभीर बाब आहे.त्याचप्रमाणे या प्रकरणात विहित कालावधीत चौकशीसुध्दा होणे आवश्यक होते. तसे झाले असते तर अपिलार्थीस माहिती मिळू शकली असती. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे मत असे आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यास झ ाालेल्या विलंबाबाबत तसेच अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीची संचिका गहाळ झाल्याबाबत संपूर्ण चौकशी जिल्हाधिकारी, लातूर यांना करावी लागेल व चौकशीमध्ये अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास महाराष्ट्र अभिलेख अधिनियम २००५ नुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक ठरत आहे.याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(२) नुसार जिल्हाधिकारी यांना शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी केलेल्या तक्रारी अर्जावर झालेल्या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थी मागत आहेत. सदरची संचिका तहसील कार्यालय,उदगीर,जि.लातूर येथे उपलब्ध होत नाही. या प्रकरणाबाबतच्या संचिकेची एक प्रत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयात असणे आवश्यक आहे. त्यामुळे माहिती अर्जाच्या संदर्भात मागितलेली माहिती अपिलार्थीस जिल्हा पुरवठा अधिकारी,लातूर यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत परिपूर्ण माहिती देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा त्यांच्या कार्यालयात शोध घेऊन परिपूर्ण माहितीची प्रत अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जिल्हाधिकारी, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र अभिलेख अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे आवश्यक कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोंविदराव पारसेवार, गोविंदराज प्रिंटीग प्रेस,रेल्वेस्टेशनजवळ,रा.उदगीर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.झेरकुंटे विरभद्र लिंगप्पा, रा. उदगीर,जि. लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

तहसीलदार तहसील कार्यालय,पुरवठा विभाग उदगीर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर,जि.लातूर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिअार/९३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार(पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जि.लातूर - श्री.एम.जी.कुलकणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, अपिलार्थी यांनी उदगीर शहरातील व तालुक्यातील किरकोळ व होलसेल रॉकेल विक्रेत्यांनी रॉकेल विक्री केल्याबाबत मार्च, २००७ ते जुलै,२००९ या कालावधीची विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असून घेऊन जावी असे दि. ३०.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांना सदरची माहिती दि. १०.०१.२०१० रोजी मिळाली आहे, असे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,उदगीर यांना दि. १०.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन ही बाब दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. झेरकुंटे विरभद्र लिंगप्पा, समतानगर,विठ्ठल मंदीर,डॅम रोड,उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मलंग अब्दूल रहेमान पि.मो.इस्माईल, रा.उदगीर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| नगर परिषद कार्यालय,उदगीर,जि. लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,उदगीर,जि. लातूर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक, नगर परिषद,उदगीर,जि. लातूर - श्री.भाकसखेडे एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. नुरोद्दीन मलंग | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २२.१२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले आहे. हे प्रथम अपील १९ दिवस उशिरा दाखल केले असल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील नामंजूर करुन दि. २३.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे. तथापि त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात मागितलेल्या

एकूण २१ मुद्यांपैकी बऱ्याच मुद्यांवर माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे, अशी अपिलार्थी त्यांची बाजू द्वितीय अपिलामध्ये मांडत आहेत. याकरिता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात मुद्देनिहाय ऊहापोह होणे आवश्यक आहे, असे आयोगास वाटते. सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०८.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल रहेमान इस्माईल मलंग, रा.दबिरपुरा,उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद,उदगीर,जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.देविदास रामराव गायकवाड,रा.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अति.जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर.

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.देविदास रामराव गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.लातूर - प्रतिनिधी - डॉ. एन.डी. बोडके, प्रशासन अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. पाटील बी.एस., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही. अपिलार्थी यांच्या दि. २५.०१.२०१० रोजीच्या द्वितीय अपीलावरुन असे दिसून येत आहे की, त्यांना माहिती मिळालेली आहे. तथापि द्वितीय अपील अर्जात अपिलार्थी यांनी, "माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही. त्याचप्रमाणे आवश्यक असलेल्या माहिती मिळविण्यासाठी भरलेल्या शुल्काची पावती मिळणेबाबत." असे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थी यांनी ₹६/- इतक्या शुल्काचा भरणा केल्यामुळे दि. १६.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती पाठविण्यात आली आहे. तथापि त्यानंतर अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही, असे सुनावणीच्या वेळी नमूद केल्यामुळे पुन्हा एकदा माहिती देण्यात यावी, असा निर्णय घेतला. तदनंतर दि. १५.१२.२००९ रोजी अपिलार्थीस माहिती खासदुतामार्फत पाठविली. अपिलार्थी यांनी ही माहिती घेण्यास नकार अशी नोंद घेऊन माहिती परत आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना देण्यात आलेल्या माहितीचा एक संच जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. आयोगाच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थी यांना देण्यात आला व अपिलार्थी यांनी तो स्वीकारला. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्क जमा केल्याचा दिनांक व कीर्द इ.तपशील रोखवहीमध्ये दिसून येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अशाप्रकारचे कॅशबुक त्यांच्याकडे ठेवण्यात येत नाही. अतः ही बाब अपिलार्थीस कळविण्यात आली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड, 'श्री मावूली', दत्तमंदिरामागे, ड्रायव्हर कॉलनी, जुना औसा रोड,लातूर
२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी,<br>रा.निलंगा, जि.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पोलीस अधिक्षक,<br>पोलीस अधिक्षक कार्यालय ,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पोलीस अधिक्षक,<br>पोलीस अधिक्षक कार्यालय ,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २४.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांनी यांच्या दि.०५.०७.२०११ रोजीच्या फॅक्स संदेशाद्वारे कायदा व सुव्यवस्थेच्या व इतर शासकीय कामकाजामुळे उपस्थित राहता येत नाही, म्हणून पुढील तारीख मागितली आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी, तेरणा प्रकल्प वसाहत, निलंगा, जि.लातूर - ४१३ ५२१.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(मु.), लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.उमाकांत गणपतराव रोट्टे, : अपिलार्थी
रा.उदगीर जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी , राज्य परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय,लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय,लातूर - श्री. बी.झेड.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,लातूर - प्रतिनिधी - श्री.डी.एम.गायकवाड, विभागीय वाहतुक अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री.व्ही.एम.गुजाळे, श्री.आर.जे.देशमुख, श्री.यु.जी.देशमुख | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० मुंबई कार्यालयास प्राप्त दि.१७.०३.२०१० |

औ.बाद कार्यालयास
प्राप्त

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलर्थी त्यांच्या कार्यालयात यापूर्वी वाहनचालक या पदावर कार्यरत होते. त्यांनी दि. २५.०७.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये एकंदर ७ मुद्यांवर माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००७,२००९ असा नमूद केलेला आहे. माहितीचे शुल्क ₹२४७/- चा भरणा करा, असे अपिलार्थीस दि. २४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी दि.०८.०९.२००९ रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्याच दिवशी नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक यांच्याकडे केला नाही, असे युक्तिवादात सांगितले. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या दि. ०१.०१.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. तथापि यामध्ये खोटी माहिती मिळाली आहे, असे मोघम नमूद केले आहे.

या सर्व बाबी विचारात घेऊन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे,शिवंगण निवास,सत्ताने बिल्डींगसमोर, बिदर रोड,उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले, रा. लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, श्री शांतेश्वर विद्यालय,
सास्तूर,ता.लोहारा, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -मुख्याध्यापक, श्री शांतेश्वर विद्यालय, सास्तूर,ता.लोहारा, जि.उस्मानाबाद - श्री. चव्हाण काशिनाथ लिंबाजी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद - प्रतिनिधी- श्री. पवार बी.एस.,अधीक्षक वर्ग-२, | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले,'साधना', लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री शांतेश्वर विद्यालय, सास्तूर,ता.लोहारा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.आंगद गुणवंतराव कांबळे, : अपिलार्थी
रा.तेलगाव, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,ग्राम पंचायत कार्यालय तेलगाव,
ता.अहमदपूर, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहमदपूर, जिल्हा लातूर :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.आंगद गुणवंतराव कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तेलगाव, ता.अहमदपूर, जि.लातूर - श्री.बी. आर. राऊत | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अहमदपूर, जि.लातूर - श्री. बिराजदार ए.एन. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, ग्रामपंचायत तेलगाव, ता. अहमदपूर मधील १२ विविध विकास कामाबाबतची माहिती तसेच ग्रामसभेच्या मासिक बैठकीसंदर्भात माहिती मागितली आहे. ही माहिती सन २००४ ते दि. ०९.११.२००९ पर्यंतची मागितली आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०७.१२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील काही माहिती प्रत्यक्ष व काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली आहे. याकरिता व्यक्तिशः द्यावयाची माहिती दि. ३०.०१.२०१० रोजी अपिलार्थी यांच्या घरी पाठविण्याची व्यवस्था केली परंतु अपिलार्थी घरी नसल्यामुळे देता आली नाही. याबाबतचा पंचनामा दप्तरी दाखल आहे. त्यानंतर सर्व माहिती, एकत्रित ६५९ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात आली. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत, असा त्यांनी दाखला दिला आहे. सदरची माहिती दि. २०.०३.२०१० रोजी पाठविली आहे. ती अपिलार्थी यांनी न स्वीकारल्यामुळे त्यांच्याकडे परत प्राप्त झ ाली आहे. याची नोंद पोस्टाच्या लिफाफ्यावर आहे. आज रोजी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केली. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.आंगद गुणवंतराव कांबळे, रा.तेलगाव, ता.अहमदपुर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, तेलगाव, ता. अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पिराजी बाबुराव गोरे, : अपिलार्थी
रा.गांजूरवाडी, ता.चाकूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती चाकूर,जि लातूर
जन अपिलीय अधिकारी, :
पंचायत समिती चाकूर,जि लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पंचायत समिती, चाकूर अंतर्गत ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक (३५) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.)(१) व (२), पंचायत समिती, चाकूर, जि. लातूर - श्री. पट्टेवाड आर.व्ही. व श्री. राठोड एन.डी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (३५)व जन अपिलीय अधिकारी (२) उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी एकूण ६७ ग्रामपंचायतीची माहिती मागितली आहे. या ६७ ग्रामपंचायतीशी संबंधित एकूण ३५ ग्रामसेवक उपस्थित आहेत. अपिलार्थी यांना या सुनावणीची सूचना देऊनही ते उपस्थित नाहीत. संबंधित दोन जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.)पंचायत समिती, चाकूर उपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी उपस्थित सर्व जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र. १ ते ५ संदर्भातील माहिती देण्यात आली आहे, असे सांगितले व त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीचे नाव | दिनांक | एकूण पृष्ठे |
|---|---|---|---|
| ०१ | शिरनाळ | ०६.०२.२०१० | ६१० |
| ०२ | नायगाव | २२.०१.२०१० | ६७३ |
| ०३ | आनंदवाडी | २३.०१.२०१० | ६४० |
| ०४ | कडमुळी | ०२.०२.२०१० | ३८९ |
| ०५ | हाळी(खु.) | ०४.०२.२०१० | ४३१ |
| ०६ | मष्णेरवाडी | ०५.०२.२०१० | ६७३ |
| ०७ | वाघोली | ०४.०२.२०१० | ३१२ |
| ०८ | मोहनाळ | ०६.०२.२०११ | ३५४ |
| ०९ | वडवळ(ना.) | १०.०१.२०१० | ७७५ |
| १० | लातूररोड | १०.०१.२०१० | ८२५ |
| ११ | तिवघाळ | ०५.०२.२०१० | ४१२ |
| १२ | शिवणखेड(बु.) | ०५.०२.२०१० | ५२४ |
| १३ | आजनसोंडा(बु.) | २१.०१.२०१० | १४२० |
| १४ | टाकळगाव | ०७.०२.२०१० | ४०२ |
| १५ | हिप्पळनेर | ०३.०२.२०१० | ४३१ |
| १६ | अलगरवाडी | ०५.०२.२०१० | ६१३ |
| १७ | चाकुर | २२.०१.२०१० | १८४० |
| १८ | महाळंग्रा | १९.०२.२०१० | ३१९ |
| १९ | आटोळा | ०३.०२.२०१० | २२४ |
| २० | गोळेगाव | ०३.०२.२०१० | १३० |
| २१ | घरणी | १०.०१.२०१० | ६१० |
| २२ | लिंबाळवाडी | ०६.०२.२०११ | ३८९ |
| २३ | कबनसांगवी | ०६.०२.२०११ | ३३० |
| २४ | रामवाडी | १०.०१.२०१० | ६१० |
| २५ | केंद्रेवाडी | १०.०१.२०१० | ३१० |
| २६ | बोथी | ०६.०२.२०१० | ६८० |
| २७ | बोरगाव बु. | ०७.०२.२०१० | ४८६ |
| २८ | नागदरवाडी | ०७.०२.२०१० | ४३२ |
| २९ | झरी खु. | ३०.०१.२०१० | ५४० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | हनमंत जवळगा | २९.०१.२०१० | ७२० |
| ३१ | रायवाडी | १०.०१.२०१० | २६५ |
| ३२ | झरी बु. | १०.०१.२०१० | ३४५ |
| ३३ | देवांग्रा | ०८.०२.२०१० | ३८५ |
| ३४ | कवठाळी | १५.०१.२०१० | १०१ |
| ३५ | शिवणीमगरा | १५.०१.२०१० | १०० |
| ३६ | आंबुलगा | १०.०१.२०१० | ५८७ |
| ३७ | बावळगाव | २९.०२.२०१० | ४३० |
| ३८ | उजळंब | २९.०२.२०१० | ४२० |
| ३९ | जानवळ | १३.०२.२०१० | ५४३ |
| ४० | नांदगाव | १०.०१.२०१० | ५४० |
| ४१ | नागेशवाडी | ०६.०२.२०१० | ४५० |
| ४२ | महाळंगी | ११.०२.२०१० | ३५२ |
| ४३ | हाडोळी | ०३.०२.२०१० | ४१९ |
| ४४ | बेलगाव | ०३.०२.२०१० | ३८० |
| ४५ | बनसावरगाव | १९.०२.२०१० | २७५ |
| ४६ | घारोळा | १८.०२.२०१० | ३५५ |
| ४७ | महांडोळ | २८.०१.२०१० | २९० |
| ४८ | कळकोटी | २८.०१.२०१० | २५० |
| ४९ | गांजूर | १८.०१.२०१० | २९० |
| ५० | जठाळा | २८.०१.२०१० | ४१० |
| ५१ | ब्रम्हवाडी (ये) | २८.०१.२०१० | २२५ |
| ५२ | ब्रम्हवाडी (ब) | २८.०१.२०१० | २४० |
| ५३ | तीर्थवाडी | २८.०१.२०१० | १९२ |
| ५४ | मांडुरकी | २८.०१.२०१० | ३९९ |
| ५५ | डोंग्रज | १५.०२.२०१० | ५३२ |
| ५६ | वडगाव | १०.०१.२०१० | ३७६ |
| ५७ | शेळगाव | २८.०१.२०१० | ३०९ |
| ५८ | जगलपूर खु. | २४.०१.२०११ | २१५ |
| ५९ | अंजनसोंडा (खु.) | १०.०१.२०१० | २१५ |
| ६० | रोहिपा | २६.०२.२०१० | ३५४ |
| ६१ | मोहदक | १०.०१.२०१० | ५४८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६२ | दापक्याळ | १०.०१.२०१० | ५५० |
| ६३ | मुरुंबी | ०१.०२.२०१० | कलम ७(९) प्रमाणे माहितीची पाहणी करण्यासाठी पत्र दिले. |
| ६४ | महांळग्रावाडी | ०२.०२.२०१० | -"- |

वरील तक्त्यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. सर्व ग्रामसेवकांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे विहित मुदतीत देणे शक्य नव्हते. ती माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. यातील एका ग्रामसेवकाने अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(९) खाली पाहणी करण्यासाठी माहिती उपलब्ध आहे, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व कालावधी आणि ग्रामसेवकाकडे असलेल्या मनुष्यबळाचा विचार करता अधिनियमातील कलम ७(१) नुसार तीस दिवसांच्या आत माहिती देणे शक्य नव्हते, ही बाब आयोगास योग्य वाटते.

सर्व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. पूर्वकल्पना देऊनही अपिलार्थी अनुपस्थित आहेत.यामुळे अपिलार्थीच्या अनुपस्थितीची नोंद आयोग घेत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी एकूण ६७ ग्रामपंचायतीची माहिती मागितलेली दिसून येत आहे.अशाप्रकारे स्वतंत्र प्राधिकरणांची एकाच प्राधिकरणाकडे माहितीचा अर्ज करुन व्यापक स्वरुपाची माहिती मागणे व्यवहार्य ठरत नाही. प्रत्येक ग्रामपंचायतीस माहिती अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात त्यांना ज्या ग्रामपंचायतीसंदर्भात माहिती आवश्यक असेल त्यांच्याकडे यापुढे स्वतंत्र अर्ज करावा लागेल, याची अपिलार्थी यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थी यांनी चार वर्षांच्या कालावधीची वर नमूद केल्याप्रमाणे व्यापक अशी माहिती मागितलेली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर केंद्रीय माहिती आयोगाने माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय दिलेले आहेत.विचाराधीन माहितीच्या अर्जासंदर्भात जवळजवळ सर्व ग्रामपंचायतीतील माहिती मिळालेली आहे, असे दिसून येत आहे. याकरिता सदरचे प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

या प्रकरणात जरी विविध जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती एकत्रित करुन सकारात्मक भूमिका घेऊन माहिती देण्यात आली असली तरीही याला पूर्वोदाहरण म्हणून भविष्यात त्याचा वापर करण्यात येऊ नये व ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे, त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदी विचारात घेऊन माहितीचा अर्ज किंवा त्यातील आवश्यक भाग वर्ग करण्यात यावा व जास्त जन माहिती अधिकारी यांचेकडील माहिती विचारली असल्यास अपिलार्थीस अर्ज परत करण्यात येऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे स्वतंत्र अर्ज करण्यास कळविण्यात यावे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी परिपत्रक काढून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सूचित करावे, असे आयोगाचे निर्देश आहेत.

आयोगापुढे अपिलार्थी यांनी पाठविलेला दि. ०८.०७.२०११ रोजीचा फॅक्स संदेश आहे. यामध्ये त्यांनी वापरलेली भाषा सभ्यतेस अनुसरुन नाही. आयोगाशी अशाप्रकारचा पत्रव्यवहार भविष्यात करण्यात येणार नाही, याची दक्षता अपिलार्थीने घ्यावी, असे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पिराजी बाबुराव गोरे, रा.गांजुरवाडी, पो.गांजुर,ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, (१) शिरनाळ,/(२) नायगाव / (३) आनंदवाडी/ (४) कडमुळी/ (५) हाळी (खु) / (६) मष्णेरवाडी/ (७) वाघोली/ (८) मोहनाळ/ (९) वडवळ(ना) / (१०) लातूररोड/ (११) तिवघाळ/ (१२) शिवणखेड(बु.) / (१३) आजनसोंडा(बु) / (१४) टाकळगाव/ (१५) हिप्पळनेर/ (१६) अलगरवाडी/ (१७) चाकूर/ (१८) महाळंग्रा/ (१९) आटोळा/ (२०) गोळेगाव/ (२१) घरणी/ (२२) लिंबाळवाडी/ (२३) कबनसांगवी/ (२४) रामवाडी/ (२५) केंद्रेवाडी/ (२६) बोथी/ (२७) बोरगाव(बु.) / (२८) नागदरवाडी/ (२९) झरी (खु.) / (३०) हनमंत जवळगा/ (३१) रायवाडी/ (३२) झरी बु. / (३३) देवांग्रा/ (३४) कवठाळी/ (३५) शिवणीमगरा/ (३६) आंबुलगा/ (३७) बावळगाव/ (३८) उजळंब/ (३९) जानवळ/ (४०) नांदगाव/ (४१) नागेशवाडी/ (४२) महाळंगी/ (४३) हाडोळी/ (४४) बेलगाव/ (४५) बनसावरगाव/ (४६)घारोळा/ (४७) महांडोळ/ (४८) कळकोटी/ (४९) गांजूर/ (५०) जठाळा/ (५१) ब्रम्हवाडी(ये) / (५२) ब्रम्हवाडी(ब) / (५३) तीर्थवाडी/ (५४) मांडुरकी/ (५५) डोंग्रज/ (५६) वडगाव/ (५७) शेळगाव/ (५८) जगलपूर(खु.) / (५९) अंजनसोंडा(खु.) / (६०) रोहिपा/ (६१) मोहदक/ (६२) दापक्याळ/ (६३) मुरुंबी/ (६४) महांळग्रावाडी, ता.चाकूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, चाकूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री.बोधले गणेश शिवाजीराव,<br>रा.औसा जि.लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी<br>उपसंचालक ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद - श्री. एस. एस. स्वामी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त केल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अर्जावर कार्यवाही करुन बारा वर्षाची वेतनश्रेणी नियमाप्रमाणे १९९९ पासून देण्याबाबत आदेशाची कार्यवाही करुन माहिती द्यावी, अशाप्रकारची माहिती मागितली आहे.

अपिलार्थी हे त्याच विभागातील एक कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. अपिलार्थीस त्यांना माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०१.२०१० रोजी मागितलेली माहिती तक्रारीच्या स्वरुपात असल्यामुळे माहिती देणे अभिप्रेत नाही, असे कळविलेले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावरुन त्यांनी मागितलेली माहिती, माहिती या व्याख्येत येत नाही, त्यामुळे देय होत नाही, असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव,शिल्प निदेशक, आय.टी.आय.,औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश कमलाकर पाठक, : अपिलार्थी

रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

नगर अभियंता,बांधकाम विभाग,नगर परिषद,लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

मुख्याधिकारी,नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता, नगर परिषद, लातूर - श्री.दिलीप चिद्रे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील दाखल प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये नगर परिषद, लातूर मधील सर्व विकास कामांवरील तसेच खासदार निधी, युरीफ, दलित वस्ती सुधार योजना, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ वैशिष्टयपूर्ण कामे, मराठवाडा एकात्मिक विकास कार्यक्रम, मराठवाडा पॅकेज व केंद्र तसेच राज्य शासनाच्या योजनेतून प्राप्त झालेल्या निधीतील कामाच्या संदर्भान्वये दिलेल्या तसेच नगर परिषदेच्या फंडातून दिलेल्या वर्क ऑर्डरच्या व याशिवाय अजून इतर जर वर्क ऑर्डर दिल्या असतील तर त्या संदर्भातील वर्क ऑर्डर, मोजमापपुस्तिकेच्या प्रती

इत्यादीची विस्तृत अशी माहिती ज्यामध्ये वर्क ऑर्डर, मोजमापपुस्तिकेच्या प्रती, -काढण्यात आलेल्या बिलाच्या प्रती, फॉर्म १३८, अंदाजपत्रकाची प्रती मागितल्या आहेत. त्याचप्रमाणे ज्या दिवशी माहिती देण्यात येईल, त्या कालावधीपर्यंत माहिती देण्यात यावी, असा माहितीसाठीचा कालावधी खुला ठेवण्यात आला आहे. माहितीची व्याप्ती इतक्या मोठया प्रमाणात आहे की, ती एक महिन्याच्या कालावधीत सर्व शासकीय कामांची जबाबदारी सांभाळून देणे शक्य होत नाही. माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व दि. २२.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध असून आपणास विनामूल्य देण्यात येईल कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जावी, असे कळविण्यात आले आहे. कारण अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली आहे, टपालाने पाठवू नका, असे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थी यांनी सदरची माहिती कार्यालयात उपस्थित राहून दि. २४.०६.२०११ रोजी व्यक्तिशः घेतली आहे. अपिलार्थी यांनी पोच देताना त्यामध्ये नमूद केले आहे की, ज्या दिवशी माहिती देत आहेत, त्या दिवसापर्यंतची माहिती देण्यात यावी तशी माहिती देण्यात आली नाही. मोजमापपुस्तिकेची माहिती देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या स्वरुपामध्ये एकूण २०० पेक्षा जास्त कामे असतील.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पाहता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मोठया प्रमाणात आहे. अशाप्रकारे माहिती मागितल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमामागील भूमिका व उद्दिष्टये सफल होत नाही. अशी माहिती एकत्रित करण्यास संबंधित प्राधिकरणाच्या कार्यालयातील साधनसामग्री व मनुष्यबळाचा मोठया प्रमाणावर वापर करावा लागतो, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९)अनुसार अभिप्रेत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. प्रसंगी अशा माहितीच्या अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय केंद्रीय माहिती आयोगाने घेतलेला आहे.त्याचप्रमाणे माहितीचा कालावधी खुला ठेवता येत नाही. विशिष्ट कालावधी नमूद करणे आवश्यक आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात आतापर्यंत सुमारे ११७४ पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे, असे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता मोजमापपुस्तिकांच्या प्रती संदर्भात अपिलार्थीस आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी नेमक्या एक-दोन कामाचे नाव जन माहिती अधिकारी यांना कळवावे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांना त्या कामाच्या मोजमापपुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस प्रथम पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात व त्यातील आवश्यक काही कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात. यासाठी अपिलार्थीस नेमक्या एक-दोन कामांची नावे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसात कळवावी लागतील व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना त्या कामाच्या मोजमापपुस्तिका निरीक्षण देऊन आवश्यक काही कागदपत्रांच्या छायाप्रती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

प्रसंगावशात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही नजरेस आणून दिले की, अपिलार्थी यांचे त्यांच्याकडे एकूण १०-१२ अर्ज अशीच मोठया प्रमाणात मागितलेल्या माहितीसंदर्भात आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेताना या सर्व बाबी विचारात घेऊन अशी विस्तृत माहिती मागितली असल्यास प्रथमतः अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(९) खाली निरीक्षण देण्यासाठी विचार करावा लागेल.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे नेमक्या एक-दोन कामांची नावे कळविल्यानंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत, त्या कामाच्या मोजमापपुस्तिकांचे निरीक्षण देऊन आवश्यक काही कागदपत्रांच्या छायाप्रती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश कमलाकर पाठक, मन्वंतर सम्राट चौक, कोयना सब स्टेशन रोड, लातूर- ४३१ ५१२

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अमोल बाळकृष्णराव नानजकर,रा.लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी, | : | |
| | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अमोल बाळकृष्णराव नानजकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्री.चंद्रकांत पंढरी राऊत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ३१.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११.०२.२०१० फेरसादर दिनांक २२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन तसेच अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी

सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही.यास्तव प्रकरणात उपआयुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी मुंबई-११ यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी मुंबई-११ यांनी अपिलार्थीच्या दि.२४.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमोल बाळकृष्णराव नानजकर,सा. गुरुकुल कार्यालय, स्वस्तीश्री निवास, व्यंकटेश नगर, अंबाजोगाई रोड, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी मुंबई-११ (अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या व त्यासंदर्भातील प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देवकत्ते रामराव गुंडेराव, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
लघु पाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग कंधार, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे स्थानिक स्तर विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, ल.पा. (स्था.स्तर), उपविभाग,कंधार,जि.नांदेड- श्री. ए.आर.अशरफी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) विभाग,नांदेड - श्री.के.पी.झरकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या दि. ०७.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये नंदनशिवणी होकर्णा साठवण तलाव,ता.कंधार,जिल्हा नांदेड या प्रकल्पाची एकूण २७ मुद्यांवर विविध तांत्रिक माहितीच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. याकरिता कार्यालयास निधी उपलब्ध होताच माहिती देण्यात येईल व त्यापूर्वी विभागीय

कार्यालयात पाहणीकरिता माहिती उपलब्ध करुन ठेवली आहे त्याची पाहणी करावी, असे अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे दि. २९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे विहित मुदतीत कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही म्हणून अपिलार्थीस दि. १९.११.२००९ रोजी संपूर्ण माहिती (एकूण ७४१ पृष्ठे) नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपिलावरुन त्यांना माहिती प्राप्त झाली आहे, असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जात त्यांना अपूर्ण,खोटी माहिती मिळाली आहे, असे मोघम नमूद केलेले आहे. नेमके नमूद केलेले नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देवकत्ते रामराव गुंडेराव, द्वारा मातृछाया निवास,टी.जी.पांचाळचा वाडा,महात्मा फुले शिक्षक कॉलनी, अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.मल्लीकार्जून श्रीरंग पाटील,रा.उजनी, ता.औसा,जि.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

मुख्याध्यापक, श्री गणेश विदयालय,उजनी, ता.औसा, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -मुख्याध्यापक, श्री गणेश विदयालय,उजनी, ता.औसा, जि.लातूर- श्री. वाघमारे बी.एच. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.)जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त केल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्रीमती ए.डी.कागे यांच्या मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत मागितली आहे. अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहिती मागितली, त्यावेळी सदरचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.लातूर यांच्याकडे पाठाविण्यात आला नव्हता.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगास दाखविण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज तयार आहे व अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः मागितली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गणेश विद्यालय,उजनी, ता.औसा, जि.लातूर यांना एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्यासाठी नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे लागेल. अपिलार्थी उपस्थित झाल्यास अपिलार्थीस माहितीच्या प्रती हस्तांतरित कराव्या लागतील.

अतः आयोगाच्या स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मल्लीकार्जून श्रीरंग पाटील, मु.पो.उजनी,ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गणेश विदयालय,उजनी, ता.औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.)जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहम्मद शूकुर इस्माईल बागवान, : अपीलकर्ता
रा.भोकरंबा, ता.रेणापूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
विस्तारअधिकारी (पंचायत ), पंचायत समिती,रेणापुर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी पंचायत समिती,रेणापूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/९४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहम्मद शूकुर इस्माईल बागवान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, रेणापुर,जि.लातूर - श्री.पुट्टेवाड एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती रेणापुर, जि.लातूर - श्री.व्ही.जी.लोखंडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त केल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील झाल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना आतापर्यंत मिळालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयाची माहिती त्यांच्याकडे आज उपलब्ध आहे व ते अपिलार्थीस देऊ शकतात, असे आयोगास केले. आयोगाच्या सूचनेप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. अपिलार्थी यांनी त्या माहितीची पाहणी करावी. अपिलार्थीस त्यांना प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात काही

अपूर्णता आढळल्यास जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांचे आत कळवावे लागेल. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन अपिलार्थीस उर्वरित मुद्देनिहाय माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी लागेल. त्याचप्रमाणे गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांचा खुलासा घेऊन उचित कार्यवाही योजावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

२) जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापुर, जि.लातूर यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांचा खुलासा घेऊन उचित कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद शुकूर इस्माईल बागवान, मु.पो.भोकरंबा, ता.रेणापुर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, रेणापुर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती रेणापुर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लोहार सतिष विश्वनाथ,<br>रा.किल्लारी, ता.औसा, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>गट विकास अधिकारी,पंचायत समिती, औसा, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -गट विकास अधिकारी, पंचायत समिती,औसा,जि.लातूर - श्री. कदम पी.बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. बी.एस.पाटील, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी,जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितली होती. ती माहिती दि. ०८.०३.२०१० रोजी अपिलार्थीस पोस्टाने पाठविली तसेच दि. १५.०३.२०१० रोजी अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून स्वतः प्राप्त केली आहे. अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना

खोटी,दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे व नेमकी बाब नमूद केलेले नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लोहार सतिश विश्वनाथ, रा.किल्लारी,ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तूळजाराम एकनाथ फुलारी, रा.लातूर : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

सहकार आयूक्त, म. रा. सहकारी संस्था, पुणे-१

जन अपिलीय अधिकारी तथा :

सहकार आयूक्त,म.रा.,सहकारी संस्था, पुणे-१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/९५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त केल्याची तारीख | | दि. ०५.०६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२००७ फेरसादर दि.०६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही. यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी, श्रीकृष्णनगर,सम्राट चौक,लातूर - ४१३ ५१२

२. जन माहिती अधिकारी, सहकार आयुक्त, म. रा. सहकारी संस्था, पुणे-१ कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयूक्त, म. रा. सहकारी संस्था, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लांडगे रामकृष्ण विश्वनाथ, : अपीलकर्ता
रा.गुंफवाडी, ता. जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे/पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लांडगे रामकृष्ण विश्वनाथ | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर - श्री. बी.आर. शेलार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर- प्रतिनिधी- श्री.बी.एस.पाटील, कक्ष अधिकारी (साप्रवि),जि.प.लातूर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रतीवर दिनांक नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०८.२००९ (फेरसादर दि.१७.०४.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०५.१२.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या

मूळ अर्जान्वये हातपंप/विद्युत पंप मदतनीस या पदाच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीस दि. ०६.०१.२००९ रोजी कालबध्द पदोन्नतीबाबतचे शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, असे कळविले आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठतासूचीबाबत अपिलार्थीस अवगत केले आहे. तदनंतर १८ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. ०७.०७.२०११ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे. तथापि आयोगाने सूचित केल्याप्रमाणे आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रतींचा एक संच अपिलार्थीस देण्यात आला. या पार्श्वभूमीवर आयोगाच्या स्तरावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लांडगे रामकृष्ण विश्वनाथ,मु.गुंफवाडी, पो.तावरजखेडा, व्हाया बोरगाव काळे, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,

औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. एंगाले लक्ष्मण पांडुरंग,<br>रा.गुडसुर,ता.उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा,<br>गुडसुर,ता.उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, गुडसुर,ता.उदगीर,जि.लातूर- श्री.गुडसूरकर मधुसूदन लक्ष्मीकांतराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर- प्रतिनिधी - श्री.बिरादार बी.पी., अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, गुडसुर,ता.उदगीर,जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दि. ०५.०१.२०१० रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी यांना दि. ०८.०१.२०१० रोजी शुल्क ₹२२/- इतक्या रकमेचा भरणा करावा, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी या शुल्काचा दि. २७.०१.२०१० रोजी भरणा केला आहे. तदनंतर दि. ३०.०१.२०१० रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती व्यक्तिशः देण्यात आली आहे. या माहितीमध्ये एकूण १५ पृष्ठांचा समावेश आहे. अपिलार्थी यांची पोच त्यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एंगाले लक्ष्मण पांडुरंग, द्वारा ॲड. एम.एम.मान्नीकर, नवी अबादी, उदगीर, ता. उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, गुडसुर, ता.उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. चिखले सुर्यभान वामनराव,<br>रा.शेल्हाळ, ता.उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, उदगीर, जि.लातूर - श्री. सी.व्ही.कस्तुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर - श्री. बी.आर.शेलार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग, उदगीर, जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ

अर्जाद्वारे उदगीर तालुक्यातील जवाहर विहिर योजने अंतर्गत झालेल्या कामाबाबत तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे.या माहितीकरिता ₹८७/- इतक्या शुल्काचा कार्यालयात भरणा करावा म्हणजे माहिती पुरविण्यात येईल, असे दि. २९.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी याच माहितीसाठी दि. १९.०१.२०१० रोजी त्यांच्याकडे अर्ज पाठविला आहे. या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर ₹८७/- इतक्या शुल्काचा भरणा करावा, असे अपिलार्थीस दि. २९.०१.२०१० रोजी कळविले आहे. अपिलार्थी यांनी दि. ०५.०३.२०१० रोजी शुल्काचा भरणा केला आहे. तदनंतर अपिलार्थीस दि. ११.०३.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविली आहे. त्यासंदर्भातील पोच त्यांच्या दप्तरी उपलब्ध आहे. दोन माहितीसाठीच्या अर्जांद्वारे एकसारखीच माहिती मागितलेली असल्यामुळे दि. १९.०१.२०१० रोजी कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविलेला अर्ज निष्प्रभ ठरत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी दि. २१.०४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केल्यानंतर त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०७-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चिखले सूर्यभान वामनराव, मु.शेल्हाळ,पो.तोंडचिर,ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११४४ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. १२-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०७.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०७-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११४५ | | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. | १२-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९.०७.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०९.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११४९ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. १२-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०१.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | निरंक |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०७.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.पुंडलिक वैजनाथ चाटे,<br>रा.चापोली,ता.चाकूर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ चापोली, ता. चाकूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सचिव, नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ, चापोली,ता.चाकूर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर - सौ. स्वाती अ. पाडळकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे व ही माहिती जन माहिती अधिकारी तथा सचिव,नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ, चापोली, ता.चाकूर, जि.लातूर यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे.त्याचप्रमाणे या संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या संजीवनी माध्यमिक विद्यालय, चापोली तथा संजीवनी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय

चापोलीचे प्राचार्य यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे तीन वेळा माहिती पाठविली आहे. तथापि अपिलार्थी यांनी रजिस्टर्ड टपाल सोडवून घेण्यास नकार दिला आहे. ही बाब जन माहिती अधिकारी तथा सचिव यांच्या अपिलार्थीस दिलेल्या दि. १९.१२.२००९ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केली आहे. त्याचप्रमाणे सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दि. २३.११.२००९ रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे दोन मुद्यांवरील माहितीच्या नकला पुन्हा एकदा पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपिलावर ' /०१/०१०' अशी तारीख नमूद केलेली असून अपील अर्जात त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे की, त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व जाणुनबुजून अपूर्ण व खोटी माहिती दिली आहे. नेमकी अपूर्ण, खोटी कोणती माहिती प्राप्त झाली आहे या बाबत त्यांच्या द्वितीय अपिलात कोणताही मुद्दा स्पष्टपणे नमूद केलेला नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीस माहिती देण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केल्याचे कागदपत्रांवरुन दिसत आहे. अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. पुंडलिक वैजनाथ चाटे, रा.मु.पो.चापोली, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ, चापोली, ता. चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कारनाळे नारायण नागनाथ, : अपीलकर्ता
रा.उजना, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रम शाळा, तुळशीराम तांडा, ता.अहमदपूर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कारनाळे नारायण नागनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रम शाळा, तुळशीराम तांडा, ता. अहमदपूर, जि.लातूर - श्री. जाधव एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, लातूर- प्रतिनिधी - श्री. शिंदे आर.एम. समाजकल्याण अधिकारी -२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १८.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १७.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात एकूण ३१ मुद्यांवर सन १९९९ ते २००९ या

कालावधीची विस्तृत, मोठया प्रमाणात व्यापक अशी माहिती मागितली आहे. ही माहिती एका महिन्यात गोळा करुन देणे शक्य नाही. तथापि मुख्याध्यापक,सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रमशाळा,तुळशीरामतांडा,ता.अहमदपूर,जि.लातूर यांनी प्रयत्न करुन सर्व माहिती एकत्रित केली. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०१.२०१० रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मागितलेली सर्व माहिती जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. सदर माहिती अपिलार्थीस त्यानंतर हस्तांतरित करण्यात आली. अपिलार्थी यांनी ही माहिती त्यांना प्राप्त झ ाली आहे, असे आज सुनावणीच्या वेळी मान्य केले. तथापि त्यांना खोटी व अपूर्ण माहिती मिळालेली आहे, असे त्यांच्या द्वितीय अपिलात मोघमपणे नमूद केले आहे. नेमका उल्लेख केलेला नाही. तसेच याबाबतचे स्पष्टीकरण ते आज आयोगासमोर देऊ शकले नाहीत.

प्रसंगावशात, अपिलार्थीस आयोगामार्फत सूचित करण्यात आले की, अपिलार्थी यांनी भविष्यात अशाप्रकारची विस्तृत प्रमाणात माहिती मागितल्यास शासनाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवून माहिती संकलीत करुन देणे व्यवहार्य ठरणार नाही, म्हणून अधिनियमातील कलम ७(९) खाली अशाप्रकारचे अपील फेटाळण्यायोग्य राहील, असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कारनाळे नारायण नागनाथ,मु.उजना,पो.गंगाहिप्परगा,ता.अहमदपूर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक माध्यमिक आश्रम शाळा तुळशीराम तांडा, ता. अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागरगोजे बळीराम सोपान, : अपिलार्थी
रा.रामवाडी, ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, पुरवठा विभाग,अहमदपूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, अहमदपूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा विभाग), तहसील कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर - श्री. कांबळे के.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००२ ते २००९ या कालावधीची प्रत्येक यंत्रणेने दिलेल्या धान्याचे रिपोर्ट व रिपोर्टचे कुपन किती व कोणत्या डिपार्टमेंटचे आले व तसेच चेअरमनकडून दाखल केलेल्या कूपनच्या गावनिहाय छायांकित प्रती अशी माहिती मागितली आहे. सदर माहिती मोफत देणे निधीअभावी शक्य नाही, त्यामुळे कार्यालयात उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थीस दि. १२.११.२००९ रोजी कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याकरिता

₹४,०९,२७१/- इतका निधी लागेल याकरिता अपिलार्थी यांना माहितीची पाहणी देण्यात यावी, असा निर्णय दि. २१.०१.२०१० रोजी घेतला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीची व्याप्ती विचारात घेऊन अधिनियमातील कलम ७(९) खाली अपिलार्थीस पाहणी देण्याचा घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही. याकरिता प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बळीराम सोपान नागरगोजे, मु.रामवाडी,पो.महाळंगी, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव,<br>रा.नांदगाव,पो.गांजूर, ता.चाकूर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>दुय्यम निबंधक कार्यालय,चाकूर,जि.लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - दुय्यम निबंधक श्रेणी-१, चाकूर, जि.लातूर - श्री.ल.मा.देवगुंटवार | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन माहिती अधिकारी - दुय्यम निबंधक श्रेणी-१, चाकूर, जि.लातूर - श्री.आ. चां.भेदेकर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - सहजिल्हा निबंधक वर्ग-१ लातूर - श्री.एन.बी.विभुते | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, चाकूर, जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००५ ते २००९ पर्यंत दुय्यम निबंधक कार्यालय,चाकूर अंतर्गत दुय्यम निबंधक या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत त्यांच्या

सेवापुस्तिका,दैनंदिन टाचणवही, पगारपत्र, त्यांच्या स्वतःच्या व कुटुंबातील सदस्यांच्या नावावर स्थावर व जंगम मालमत्ता यासह इतर अनेक मुद्यांद्वारे विस्तृत माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीपैकी संगणकीय माहितीच्या संदर्भात एकूण २५१५ पृष्ठांकरिता एकूण ₹५०३०/- इतके शुल्क भरल्यास माहिती पाठविण्यात येईल, असे अपिलार्थीस दि. ०१.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. यामध्ये शुल्क भरावयाच्या लेखाशीर्षाचा तपशील कळविला आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. दुय्यम निबंधक या पदावर कार्यरत अधिकाऱ्यांच्या सेवा कार्यकालाची माहिती दि. १२.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली आहे. तथापि त्यांच्या सेवाअभिलेखाची व स्थावर मालमत्ता इ.ची माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ कायद्यानुसार देय होत नसल्यामुळे अपिलार्थीस देण्यात आलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१ लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ३०.११.२००९ रोजी निर्णय दिला आहे. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली व माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार देय असलेली माहिती अपिलार्थीस देऊ केली आहे तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा न केल्यामुळे संपूर्ण माहिती देता आली नाही, असे नमूद केले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या,माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार देय होत असलेल्या माहितीकरिता शुल्काचा भरणा करण्याकरिता अपिलार्थीस विहित मुदतीत कळविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव,रा.नांदगाव, पो. गांजूर,ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१ लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्तात्रय माधवराव काकडे, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, जळकोट, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, जळकोट, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्तात्रय माधवराव काकडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म-२), तहसील कार्यालय, जळकोट, जि.लातूर- श्री. यु.एम.बिरादार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, जळकोट, जि. लातूर- श्री. आर.बी.लबडे | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - श्री.आर.बी.कदम (सेवानिवृत्त तहसीलदार) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी (तत्कालीन व सध्याचे) उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-२) तसेच जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगास अवगत केले की, सदर पदाचा कार्यभार नुकताच घेतल्यामुळे ते आयोगास सद्यस्थितीची माहिती सादर करु शकत नाहीत. तथापि आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या शेतजमिनीवर झालेल्या अतिक्रमणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना उपजिल्हाधिकारी, उदगीर यांनी दि. १६.०४.२००५ रोजीच्या पत्राद्वारे सदरच्या माहितीची चौकशी करुन अहवाल देण्याचे कळविले आहे. त्या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थी मागत आहेत. संदर्भित पत्राची प्रत आयोगासमोर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीतर्फे देण्यात आली. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यालयाचे प्रमुख तहसीलदार जळकोट असल्याकारणाने त्यांनी प्रकरणात स्वतः लक्ष घालावे व आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस माहिती पुरवावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तहसीलदार जळकोट, जि.लातूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवतील, याकडे व्यक्तिशः लक्ष द्यावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय माधवराव काकडे,द्वारा अण्णाराव सोलापूरे निवास, साई लॉजजवळ,नांदेड-बिदर रोड,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-२), तहसील कार्यालय, जळकोट, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जळकोट, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नवरकले नरेंद्र विजयकुमार, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री.एस.जी.माने, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री.बी.एस.पाटील, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड.नवरकले नरेंद्र विजयकुमार, 'गंगानिवास', शारदा संगीत महाविद्यालयाच्या बाजूला, संभाजीनगर, खाडगाव रोड, लातूर - ४१३५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. यादव नरसिंग माधवराव,<br>रा.तुळशीराम तांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक प्राथमिक आश्रमशाळा, तुळशीराम तांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. यादव नरसिंग माधवराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -प्रभारी मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक प्राथमिक आश्रमशाळा, तुळशीराम तांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर- श्री. जाधव एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर - प्रतिनिधी - श्री.आर.एस.शिंदे,समाज कल्याण अधिकारी वर्ग-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन १९९१ ते २००९ या कालावधीची एकूण सात मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. यामध्ये त्रयस्थ व्यक्तीची मोठया

प्रमाणात माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २२.०२.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे. यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेतलेली दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अनुसार त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेऊन व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देता येते किंवा कसे याची पाहणी करण्याकरिता पुन्हा सुनावणी घेण्याकरिता प्रकरण प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन सर्व बाजूंचे म्हणणे नोंदवून घेऊन मुद्देनिहाय निर्णय घ्यावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.३१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यादव नरसिंग माधवराव,रा.तुळशीराम तांडा,पो. गंगाहिप्परगा, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक प्राथमिक आश्रमशाळा, तुळशीराम तांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले, : अपीलकर्ता

रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

मुख्याध्यापक, श्री शांतेश्वर विद्यालय, सास्तूर,

ता.लोहारा, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले,'साधना',लक्ष्मी कॅालनी, जुना औसा रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री शांतेश्वर विद्यालय, सास्तूर, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास रामराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर - श्री. सतिश कृष्णराव शिवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर - डॉ. धनंजय दत्तात्रयराव जावळीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ३१.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | १०.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०७.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ व्यक्तींने केलेल्या बांधकामासंदर्भात एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितली आहे. यापैकी जी माहिती उपलब्ध होती, ती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०१.२०१० रोजी अपिलार्थीस पाठविली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केला यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपील अंशतः मान्य केले व उर्वरित

माहिती सात दिवसांचे आत विनामूल्य देण्यात यावी, असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०७.२०११ रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी या पत्राच्या स्थळप्रतीवर, "नगर परिषद,लातूर यांनी माहितीसंदर्भातील मुद्यांवर कार्यवाही चालू केल्याचे निदर्शनास आणून दिल्यामुळे अपील परत घेत आहे" असे नमूद केले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन सदरचे प्रकरण बंद करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड, श्री.माऊली निवास दत्त मंदीराच्या मागे,जुना औसा रोड,ड्रायव्हर कॉलनी, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बोधले गणेश शिवाजीराव, : अपिलार्थी
औसा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, औसा, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी, :
नगर परिषद, औसा, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, औसा, जि.लातूर - श्री. भंडे वि.पं. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, जि.लातूर - श्री.शेखर गुल्हाळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय निरीक्षक यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००९-१० या कालावधीमध्ये सुवर्णजयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत प्रशिक्षण योजना राबविण्याबाबतची विशिष्ट प्रपत्रामध्ये माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात दि. ३१.१२.२००९ रोजी ही बाब प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्याकडे असल्याचे कळवून दि. ०२.०१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद, औसा यांनी सन

२००९-१० या कालावधीत सदरची योजना राबविण्यात आली नाही, असे कळविले आहे. त्याचप्रमाणे प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जि.लातूर यांनी दि. २५.०१.२०१० रोजी सदरची योजना त्यांच्या कार्यालयामार्फत राबविण्यात आली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद, औसा यांना कळवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी अशाचप्रकारचे ५-६ माहितीसाठीचे अर्ज त्यांच्या कार्यालयात सादर केले आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव, शिल्प निदेशक, आय.टी.आय.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुर्यकांत विश्वनाथ अंकुलगे,<br>रा. साकोळ, ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर. | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी,<br>जि.लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुर्यकांत विश्वनाथ अंकुलगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि. लातूर - श्री.नितिन शेषराव दाताळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. पाटील बी.एस.कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रत जोडलेली नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी हे शासकीय सेवेतून मुख्याध्यापक या पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत. सेवेत असताना त्यांनी निलंगा तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्थेचे कर्ज घेतले होते. त्यावेळी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषदमार्फत हमी दिलेली आहे. त्याकरिता कोणत्याही कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या वेळी त्यांनी घेतलेल्या कर्जाऊ रकमेतील काही रक्कम बाकी असेल तर त्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या मिळणाऱ्या लाभातून वसूल करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. याबाबतची माहिती अपिलार्थीस दि.२३.०३.२०१० रोजी अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकुलगे सूर्यकांत विश्वनाथ, मु.पो.साकोळ,ता.शिरुरअनंतपाळ,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,<br>रा.उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनंत गोविंदराव पारसेवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, पुरवठा-६, लातूर यांनी आयोगाच्या कार्यालयात त्यांच्या दि.११.०७.२०११ रोजीच्या फॅक्ससंदेशाद्वारे पुढील तारीख देण्याची विनंती केली. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंदराज प्रिंटींग प्रेस, रेल्वेस्टेशनरोड, उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, पुरवठा-६, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मरे दिलीप गोविंदराव,<br>रा. औराद(श), ता.निलंगा, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, श्री बालाजी उच्च माध्यमिक विद्यालय (एमसीव्हीसी) विभाग, वलांडी, ता.देवणी, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारीी,<br>श्री बालाजी उच्च माध्यमिक विद्यालय (एमसीव्हीसी) विभाग, वलांडी, ता.देवणी, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मरे दिलीप गोविंदराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य, श्री बालाजी उच्च माध्यमिक विद्यालय (एमसीव्हीसी) विभाग, वलांडी, ता.देवणी, जि.लातूर - श्री. साबणे सी.डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली नव्हती. म्हणून दि. १३.०४.२०१० रोजी द्वितीय अपील औरंगाबाद खंडपीठापुढे केले आहे. परंतु प्राचार्य, श्री बालाजी उच्च माध्यमिक विद्यालय (एमसीव्हीसी) विभाग,

वलांडी, ता.देवणी, जि.लातूर यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती आता प्राप्त झाली आहे व त्यांचे द्वितीय अपील मागे घेण्यास अनुमती असावी, अशी विनंती केली. याबाबत त्यांचे दि. १७.०६.२०११ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मरे दिलीप गोविंदराव द्वारा दिक्षा घरसंसार भांडी स्टोअर्स,मेनरोड,औराद (श), ता. निलंगा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्री बालाजी उच्च माध्यमिक विद्यालय (एमसीव्हीसी) विभाग, वलांडी, ता.देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, श्री बालाजी उच्च माध्यमिक विद्यालय (एमसीव्हीसी) विभाग, वलांडी, ता.देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अंकुश धोंडिबा पाटील,<br>रा. बोरोळ, ता. देवणी, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, देवणी, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,देवणी, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, देवणी, जि.लातूर - श्री. शेख एम.ए. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, देवणी, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे खरिप हंगाम २००९ च्या पिकपेऱ्याबाबत एकूण पाच मुद्यांवर माहिती मागितली आहे. माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितली आहे. तथापि मागितलेल्या माहितीमध्ये नेमके काय अभिप्रेत आहे, हे विचारात घेऊन दि. ०३.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. माहिती अपूर्ण मिळाली म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०२.२०१० रोजी सुनावणी घेऊन दिलेल्या निर्णयामध्ये मुद्दा क्र. २,३,४ व ५

ची माहिती देण्याबाबत आदेशित केले.त्यानुसार अपिलार्थीस दि. ०६.०२.२०१० रोजी व्यक्तिश: माहिती दिली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याबाबतची पोहच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी प्रश्नार्थक माहिती मागितली असली तरी माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत आहे

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकुश धोंडिबा पाटील,रा. बोरोळ, ता. देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर,<br>रा.गंगापूर, ता.जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर - प्रतिनिधी - श्री. नरसिंह प्रभाकरराव जावळीकर, विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती,लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. बी.एस.पाटील,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० (फेरसादर दि.१९.०४.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, प्रस्तुत द्वितीय अपील प्रकरण हे अपिलार्थीच्या दि. ०३.११.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात आहे.

याच माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात दि. ०७.०७.२०११ रोजी क्र. ९२५/१० या द्वितीय अपिलावर सुनावणी झाली आहे.

ही बाब विचारात घेता,या प्रकरणी पुन्हा नव्याने सुनावणी घेण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. म्हणून हे प्रकरण निष्प्रभ ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर, रा.गंगापूर, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. व्ही. एस.आकणगिरे, : अपीलकर्ता

रा.रेणापूर, ता.जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, लातूर

जन अपिलीय अधिकारी, :

जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.लातूर - प्रतिनिधी - श्री. एस.जी. माने, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. बी.एस.पाटील, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये २० वर्षांच्या कालावधीमध्ये प्राथमिक विद्यालयाच्या मंजूरीसाठी विविध संस्थेमार्फत जिल्हा परिषदेमध्ये दाखल केलेल्या प्रस्तावांची एकंदर दहा मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. ही माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस एक महिन्याच्या आत देता येणे शक्य नाही. माहिती देण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली होती. अपिलार्थी यांनी प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केले आहे.

त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन असा निर्णय दिला आहे की, माहिती अधिकारी यांनी अर्जदारास तात्काळ चर्चेला बोलावून नेमकी कोणती माहिती हवी आहे, याबाबत विचारणा करावी तसेच जी माहिती त्वरित देता येऊ शकते ती दोन दिवसात अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १५.०४.२०१० रोजी कळविले आहे की, त्यांच्या विभागाने माहिती तयार केली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार असल्याने कार्यालयाशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या अर्जान्वये २० वर्षांची विस्तृत अशी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अशाप्रकारे विस्तृत माहिती मागितली असल्यास व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामग्रीचा मोठया प्रमाणावर वापर होत असल्यास अपिलार्थीस माहितीची पाहणी देणे योग्य ठरते. यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. याकरिता जन माहिती अधिकारी यांना एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. व्ही. एस.आकणगिरे, मु.पो.ता.रेणापूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बी. एन. हारनुळे,<br>रा.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य,पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १२-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन, लातूर - श्री. देशमुख विनायक शेषेराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्राचार्य,पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन, लातूर - श्री. कुंभार बलभीम कृष्णाय | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०९.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ११.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे व ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात आहे. जी माहिती देय होत आहे, त्या माहितीपोटी ₹२९/- इतक्या शुल्काचा कार्यालयात भरणा करावा, असे दि. ०९.१२.२००९ रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी दि. २०.१२.२००९ रोजी शुल्काचा भरणा केला व त्याच दिवशी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले आहे. त्या अपिलावर दि. १०.०२.२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पुरणमल लाहोटी, शासकीय तंत्र निकेतन, लातूर यांनी सुनावणी घेऊन यासंदर्भात अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या बरोबर असलेली कागदपत्रे देण्यात यावी, असा निर्णय घेतला. याकरिता एकंदर ₹७३/- शुल्काचा भरणा करावा, असे अपिलार्थीस दि. ०३.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले. अपिलार्थी यांनी या शुल्काचा दि. ११.०३.२०१० रोजी भरणा केल्यानंतर त्याचदिवशी माहितीच्या प्रती देण्यात आल्या आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या दि. १७.०४.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जात त्यांना माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली म्हणून अपील केले आहे, असे मोघमपणे नमूद केले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. एन.हारनुळे, केशव नगर, जुना रेणापूर नाका,अंबाजोगाई रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. काझी अबुसईद लियाखत अली,<br>रा.औसा, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पु.),<br>तहसील कार्यालय, औसा, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,औसा, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. काझी अबुसईद लियाखत अली | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पु.),<br>तहसील कार्यालय, औसा, जि.लातूर- सौ. व्ही.एस.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रभारी तहसीलदार,औसा, जि.लातूर - सौ.व्ही.एस.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती तथा अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २५.०१.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये स्वस्त धान्य व रॉकेल वितरणाबाबत जानेवारी, २००९ ते जानेवारी,२०१० या कालावधीची एकूण १६ मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे.

त्यापैकी बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपातील आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.),तहसील कार्यालय, औसा, जि.लातूर यांनी अपिलार्थीस दि. ०२.०२.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. याउपरही आपण विचारणा केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध अभिलेखांची पाहणी करुन शुल्क भरुन जाऊ शकतात.

अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०२.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे व त्यामध्ये अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या संचिकेमधील माहितीचे निरीक्षण देऊन आवश्यक कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत, असा निर्णय घेतला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती सशुल्क द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस सशुल्क द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काझी अबुसईद लियाखत अली, रा.कादरीनगर,औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.),तहसील कार्यालय, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११४६ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. २०-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०७.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११४७ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. २०-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०७.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०९.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कुरे बालाजी माधवराव,<br>रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>सचिव,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११५० | | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. | २०-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०१.०१.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ५ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | निरंक |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.०७.२०१० |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चिखले सुर्यभान वामनराव, : अपीलकर्ता
रा. शेल्हाळ, पो. तोंडचिर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चिखले सुर्यभान वामनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. भाकसखेडे एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०४-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १०-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २१-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेली माहिती एका खाजगी दवाखान्याबाबतची आहे. या माहितीपोटी दिनांक ०४-०१-२०१० च्या पत्रानुसार रुपये १४८ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. त्यानुसार शुल्क रुपये १४० इतके अपिलार्थी यांनी दिनांक १४-०१-२०१० रोजी भरणा केले व जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, नगर परिषद, उदगीर यांच्याकडून व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेतली. तथापि त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण आहे. आयोगाने यावर अपिलार्थीस सूचित केले की, अपूर्ण म्हणजे नेमकी कोणती ही बाब स्पष्ट करावी म्हणजे जन माहिती अधिका-याला त्याप्रमाणे कारवाई करणे शक्य होईल. यावर अपिलार्थी यांनी मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यांना मिळाली नाही असे सांगितले.

यावर जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना दिनांक १४-०१-२०१० रोजी माहितीसंदर्भात कळविले आहे. ही बाब अपिलार्थीने मान्य केली नाही. आयोगास असे दिसून येते की, या इमारतीवर नियमबाह्य तीन मजल्याचे बांधकाम झाले आहे व हे बांधकाम नगरपालिकेच्या नजरेस आले असल्यास / आणून दिले असल्यास त्या बांधकामाच्या प्रती, पूर्णत्वाची प्रत दिली असल्यास त्याची प्रत व अवैध बांधकाम होत आहे त्याबाबत नोटीस दिली असल्यास इत्यादी माहिती अपिलार्थीस देय होत आहे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल व ही बाब मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर यांना पहावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, नगर परिषद, उदगीर हे वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवतील याची खातरजमा त्यांनी व्यक्तिशः करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चिखले सुर्यभान वामनराव, रा. शेल्हाळ, पो. तोंडचिर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वाघमारे पंढरी देवबा, : अपीलकर्ता
पशु वैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर-०६

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधिष्ठाता (पशुविज्ञान), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर - ०६

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वाघमारे पंढरी देवबा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लघुलेखक उच्च श्रेणी व मा. कुलसचिव यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर<br>- श्री. प्रमोद पि. खराबे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिष्ठाता (पशुविज्ञान), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ३०-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १६-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०४-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये एकूण २८ मुद्दयांवर माहिती मागितली आहे. ते सेवेत असताना माहिती मागितली आहे व आता ते सेवानिवृत्त झाले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती मिळाली हे मान्य केले तथापि काही माहिती अपूर्ण मिळाली आहे असे त्यांनी सांगितले. आयोगाने सूचित केल्यानंतर नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली ही बाब अपिलार्थीने आयोगास खालीलप्रमाणे सांगितली.

१. मुद्दा क्रमांक १ मधील मा. राज्यपाल यांनी दिनांक ०३-११-२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीस पदोन्नती दिली त्या पत्राची प्रत.

२. मुद्दा क्रमांक ९ मध्ये दोन त्रयस्थ यांना पात्र ठरवून मुलाखतीस बोलाविण्यात आले आहे त्यांना पात्र ठरवून मुलाखतीस बोलाविण्यात आलेल्या टिपणीची प्रत त्यांना मिळाली नाही.

३. मुद्दा क्रमांक ३ बाबत माहिती अपिलार्थी यांना प्राप्त झाली नाही.

४. मुद्दा क्रमांक १४ मधील अपिलार्थीने एकूण तीन अर्ज सक्षम प्राधिकरणाकडे केले आहेत असे नमूद केले आहे त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या झेरॉक्स प्रती.

५. मुद्दा क्रमांक १६ मध्ये मा. राज्यपाल, कुलसचिव व कुलगुरु यांनी अपिलार्थी यांच्या प्रकरणात एक महिन्याच्या आत निर्णय घ्यावा असे आदेश दिले आहेत त्या आदेशावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती.

६. मुद्दा क्रमांक १९ मध्ये त्रयस्थांच्या उपकुलसचिव नियुक्तीच्या आदेशाच्या प्रती.

७. मुद्दा क्रमांक २० मध्ये नमूद केलेल्या त्रयस्थांच्या नियुक्ती आदेशाची प्रत व त्यांचा एकूण पगार व पे स्केल.

८. मुद्दा क्रमांक २३ मधील त्रयस्थाची उप कुल सचिव (आस्थापना) पदावर नामनिर्देशनाने निवड झ ालेल्या आदेश / टिपणीची प्रत.

९. मुद्दा क्रमांक २५ मध्ये उप कुल सचिवांची दोन पदे आहेत त्यावर नियुक्ती करताना याबाबत आरक्षणाच्या संदर्भात विचार करण्यात आला किंवा कसे याबाबतची टिपणीची प्रत.

१०. मुद्दा क्रमांक २७ मधील उप कुलसचिव या पदावर नियुक्ती केल्याच्या संदर्भात नियुक्ती आदेशाची प्रत.

११. मुद्दा क्रमांक २८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात दिली असल्यास त्याच्या प्रती.

अपिलार्थी यांनी वर नमूद केलेली माहिती त्यांच्या मूळ अर्जाच्या माहितीमधील आहे त्यामुळे त्यांना ती देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थी यांना वर नमूद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच एका महिन्याच्या आत जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत मिळेल ही बाब पाहण्याची जबाबदारी डॉ. व्ही. पी. दांडगे, कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञ ाान विद्यापीठ, नागपूर यांच्यावर आयोग निश्चित करीत आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस ही माहिती मिळेल हे पहावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना देय होत असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात येईल ही बाब व्यक्तिशः पहावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वाघमारे पंढरी देवबा, पशु वैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा लघुलेखक उच्च श्रेणी व मा. कुलसचिव यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठता (पशुविज्ञान), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दादाराव अंकुशराव भंडारकोटे, : अपीलकर्ता
तर्फे एन. एस. रेड्डी,
श्री. ऑईल एजन्सी, वंदना टॉकीज, भारत सोसायटी, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, नांदेड<br>- श्री. बालासाहेब गंगाधर कानोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था, नांदेड<br>- श्री. नारायण विठ्ठलराव आघाव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांची समिती ही ए. पी. एम. सी. ॲक्ट खाली निर्माण झाली आहे व त्यांच्या समितीस शासनाची कोणतीही मदत / अनुदान मिळत नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ त्यांना लागू होत नाही. याबाबत राज्य माहिती आयोग अमरावती खंडपीठ यांनी अपील क्रमांक १४४१/२००८ मध्ये दिनांक ०४-११-२००९ रोजी श्री. जितेंद्र अशोक कुयरे, वसुंदरा माधवनगर, खामगांव, जिल्हा बुलढाणा विरुध्द सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती खामगाव जिल्हा बुलढाणा या प्रकरणामध्ये निर्णय दिलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संबंधित नस्ती शोध घेऊनही ती सापडली नाही असे अपिलार्थीस दिनांक १६-०१-२०१० ला कळविण्यात आले आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था, नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी या कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये पूर्वी कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १०-०२-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही नमूद केले की, सदरची संचिका सांभाळण्याची जबाबदारी असणा-या कर्मचा-याविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांच्या अर्जामध्ये तक्ता तयार करुन त्या तक्त्यात माहिती मागितली आहे जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही, ही बाब विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दादाराव अंकुशराव भंडारकोटे, तर्फे एन. एस. रेड्डी, श्री. ऑईल एजन्सी, वंदना टॉकीज, भारत सोसायटी, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख महेबुब हुसेनसाब,<br>नंदनवन कॉलनी, अहमदपूर, तालुका अहमदपूर,<br>जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर<br>- श्री. व्ही. एस. उंदरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर<br>- श्री. व्ही. जी. मठपती | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने प्रथम अपील सादर केले नाही त्यामुळे त्याची सुनावणी झाली नाही. अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलामध्ये ही बाब नमूद केल्याचे दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख महेबुब हुसेनसाब, नंदनवन कॉलनी, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सायस नारायण मुंढे, : अपीलकर्ता
बँक कॉलनी, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सायस नारायण मुंढे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. मोरे डी. के., अव्वल कारकून | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये एकूण दोन मुद्दयावर चौकशी अहवालाच्या प्रती मागितल्या होत्या त्या त्यांना अद्यापपावेतो मिळालेल्या नाहीत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे प्रथम अपिलावर सुनावणी झाली तथापि निर्णय त्यांना प्राप्त झालेला नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची पुन्हा रितसर सुनावणी घेऊन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करणे आवश्यक ठरत आहे. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सायस नारायण मुंढे, बँक कॉलनी, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दाऊद नबीसाब ताशेवाले, : अपीलकर्ता
रा. खरौळा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, रेणापूर,
जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, रेणापूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दाऊद नबीसाब ताशेवाले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, रेणापूर,<br>जिल्हा लातूर - श्री. एस. एम. देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, रेणापूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती मिळालेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलात त्यांना खोटी माहिती मिळाली आहे असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थीस सुनावणीच्या वेळी सूचित करण्यात आले की, त्यांनी त्यांना मिळालेली माहिती नेमकी खोटी कशी आहे ही बाब जन माहिती अधिकारी यांच्याकडे पंधरा दिवसाच्या आत कळवावी व पुढील पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना ही बाब तपासून अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस माहिती पुरवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दाऊद नबीसाब ताशेवाले, रा. खरौळा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश कमलाकर पाठक, : अपीलकर्ता
मन्वंतर, सम्राट चौक, कोयना सब स्टेशन रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर अभियंता, बांधकाम विभाग, नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर अभियंता, बांधकाम विभाग, नगर परिषद, लातूर<br>- श्री. चिद्रे डी. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये नगर परिषद, लातूर मधील सर्व विकास कामांवरील तसेच खासदार निधी, युरीफ, दलित वस्ती सुधार योजना, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ वैशिष्ट्यपूर्ण कामे, मराठवाडा

एकात्मिक विकास कार्यक्रम, मराठवाडा पॅकेज व केंद्र तसेच राज्य शासनाच्या योजनेतून प्राप्त झालेल्या निधीतील कामाच्या संदर्भान्वये दिलेल्या तसेच नगर परिषदेच्या फंडातून दिलेल्या वर्क ऑर्डरच्या व याशिवाय अजून इतर जर वर्क ऑर्डर दिल्या असतील तर त्या संदर्भातील वर्क ऑर्डर, मोजमाप पुस्तिकेच्या प्रती इत्यादीची विस्तृत अशी माहिती ज्यामध्ये वर्क ऑर्डर, मोजमाप पुस्तिकेच्या प्रती काढण्यात आलेल्या बिलाच्या प्रती, फॉर्म १३८, अंदाजपत्रकाची प्रती मागितल्या आहेत. त्याचप्रमाणे ज्या दिवशी माहिती देण्यात येईल, त्या कालावधीपर्यंत माहिती देण्यात यावी, असा माहितीसाठीचा कालावधी खुला ठेवण्यात आला आहे. माहितीची व्याप्ती इतक्या मोठ्या प्रमाणात आहे की, ती एक महिन्याच्या कालावधीत सर्व शासकीय कामांची जबाबदारी सांभाळून देणे शक्य होत नाही. माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व दिनांक २२-१२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध असून आपणास विनामूल्य देण्यात येईल, कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जावी, असे कळविण्यात आले आहे. कारण अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली आहे, टपालाने पाठवू नका, असे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थी यांनी सदरची माहिती कार्यालयात उपस्थित राहून दिनांक २४-०६-२०११ रोजी व्यक्तिशः घेतली आहे. अपिलार्थी यांनी पोच देताना त्यामध्ये नमूद केले आहे की, ज्या दिवशी माहिती देत आहेत, त्या दिवसापर्यंतची माहिती देण्यात यावी तशी माहिती देण्यात आली नाही. मोजमाप पुस्तिकेची माहिती देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या स्वरुपामध्ये एकूण २०० पेक्षा जास्त कामे असतील.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज पाहता अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते व अर्ज निष्प्रभ ठरतो असे आयोगाचे मत आहे व माहिती अधिकार अधिनियम मधील कलम ७ (९) नुसार अशा माहितीचा अर्ज रद्द ठरविता येतो कारण अपिलार्थी यांनी विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्यामुळे ही माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे. केंद्रीय माहिती आयोगानेही अशा प्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देणे आवश्यक नाही असे प्रसंगी निर्णय घेतलेले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी शक्य होईल तेवढी माहिती अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अपिलार्थीने त्यास प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

त्याचप्रमाणे माहितीचा कालावधी खुला ठेवता येत नाही. विशिष्ट कालावधी नमूद करणे आवश्यक आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात आतापर्यंत सुमारे ११७४ पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे, असे दिसून येत आहे. मोजमाप पुस्तिकांच्या प्रती संदर्भात अपिलार्थीस आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी नेमक्या एक-दोन कामाचे नाव जन माहिती अधिकारी यांना कळवावे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांना त्या कामाच्या मोजमाप पुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस प्रथम पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात व त्यातील आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात. नेमक्या एक-दोन कामांची नावे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसात कळवावी लागतील व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना त्यासंदर्भातील माहितीच्या छायाप्रती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

प्रसंगावशात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही नजरेस आणून दिले की, अपिलार्थी यांचे त्यांच्याकडे एकूण १०/१२ अर्ज अश्याच मोठ्या प्रमाणात मागितलेल्या माहितीसंदर्भात आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्रथम अपिलाची सुनावणी घेताना या सर्व बाबी विचारात घेऊन अशी विस्तृत माहिती मागितली

असल्यास माहिती अधिकार अधियिमातील कलम ७ (९) मधील तरतुदींचा सांगोपांग विचार करुन माहिती देणेबाबतचा निर्णय घेणे जरुरीचे ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे नेमक्या एक-दोन कामांची नावे कळविल्यानंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत, त्या कामाच्या मोजमापपुस्तिकांचे निरीक्षण देऊन आवश्यक काही कागदपत्रांच्या छायाप्रती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश कमलाकर पाठक, मन्वंतर, सम्राट चौक, कोयना सब स्टेशन रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अभंग व्यंकटराव साळुंके, : अपीलकर्ता

मु. भिंगोली, पो. कळमगांव, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भिंगोली, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अभंग व्यंकटराव साळुंके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भिंगोली, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर<br>- श्री. पोतदार बालाजी जनार्धनराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १०-०७-२०११ च्या पत्रान्वये देण्यात आली आहे. माहिती देण्यासाठी विलंब झालेला आहे. हा विलंब क्षमापित करण्यात यावा.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळालेली आहे व त्यांचे समाधान झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभंग व्यंकटराव साळुंके, मु. भिंगोली, पो. कळमगांव, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भिंगोली, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल,<br>रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाज कल्याण अधिकारी (जा.प्र.प.), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. मुखम डी. एस., जनसंपर्क अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाज कल्याण अधिकारी (जा.प्र.प.), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २३-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १९-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ३०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी (जा.प्र.प.), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वनाथ काशीनाथ घ्याडे, : अपीलकर्ता
मु. पो. तोंडचिर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तोंडचिर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वनाथ काशीनाथ घ्याडे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तोंडचिर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. एच. एम. केंद्रे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. यु. एम. केंद्रे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, दिनांक २१-०४-२०१० रोजी नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस माहिती पाठविली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात माहिती मिळाली नाही असे आयोगास सांगितले.

आज रोजी या माहितीचा एक संच जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. तो आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्विकारला. अपिलार्थी यांना या माहितीची पाहणी करुन यात जी माहिती अपूर्ण आहे त्याबाबत पंधरा दिवसाच्या आत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांना कळवावे लागेल. तसेच अपिलार्थी यांचा मुद्दा क्रमांक तीन बाबत आक्षेप आहे. त्यांना खरेदीखत स्टँम्प नक्कल क्रमांक ४३२१ ची आवश्यकता आहे असे त्यांनी आपल्या मूळ अर्जात नमूद केले आहे. याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांना चौकशी करुन त्याची नक्कल अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवतील हे पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वनाथ काशीनाथ द्याडे, मु. पो. तोंडचिर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तोंडचिर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. स्वामी शोभा चंद्रकांत, : अपिलार्थी
रा.औसा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,औसा,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औसा,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,औसा,जि.लातूर- श्री. जावळे एस.पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औसा,जि.लातूर- श्री. के.आर.शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यापैकी तीन मुद्यांची माहिती दि. १३.०१.२०१० रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. मुद्दा क्र.४ बाबत माहिती उपलब्ध नसल्याने देता येत नाही, असेही कळविले आहे. अपिलार्थी

अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तथापि मुद्दा क्र. ३ व ४ बाबतची परिपूर्ण माहिती दिली नाही, असे नमूद केले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार देय होत असलेली व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,औसा,जि.लातूर यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे, असे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती स्वामी शोभा चंद्रकांत, बँक कॉलनी, मुक्तेश्वर रोड,औसा, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुजम्मील छोटेमियॉ, : अपिलार्थी
रा.औसा, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था,औसा,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.औसा,जि.लातूर - श्री.एम.एस.लटपटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर - प्रतिनिधी - सौ. स्मृती पाटील, सहायक निबंधक (प्र.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी,जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २९.१२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे विजय अमर मजुर सह.सोसायटी, औसा,जि.लातूर याबाबतची माहिती मागितली आहे. त्यामध्ये काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपामध्ये आहे. अपिलार्थी यांनी मजूर सहकारी संस्थेबाबत माहिती मागितल्यामुळे त्यांचा अर्ज मजूर सहकारी संस्थेचे सचिव तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०१.२०१० रोजी वर्ग करण्यात आला व अपिलार्थीस कळविण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत त्यांच्या

कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि. ३०.०१.२०१० रोजी देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०७.०५.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, संबंधित संस्थेने अपिलार्थीस माहिती द्यावी, त्यानुसार अपिलार्थीस संस्थेने दि. २४.०५.२०१० रोजी माहिती दिली. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. तथापि त्यांचे दि. १०.०५.२०१० रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे. नेमके नमूद केलेले दिसून येत नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती देय होत आहे व उपलब्ध आहे, ती देण्यात आली आहे, असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुजम्मील छोटेमियॉ,काजी मोहल्ला, करपुडे सॉ मील शेजारी, औसा,जि.लातूर-४१३५२०

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता.औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सूर्यवंशी श्रीनंद संग्राम,<br>रा.आंबेगाव, ता.देवणी, जि.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी,जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी,जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सूर्यवंशी श्रीनंद संग्राम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १६.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ११.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची वस्तुस्थिती आयोगास समजू शकली नाही. याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सूर्यवंशी श्रीनंद संग्राम, रा.आंबेगाव,पो. गुरनाळ,ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

(१)श्री. विनायक कोंडिबा डाके, : अपिलार्थी

(२) श्री. मधुकर खंडोबा चिगळे

रा.अंधोरी, ता. अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विनायक कोंडिबा डाके व श्री.मधुकर खंडोबा चिगळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी (सध्याचे)- ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,अंधोरी, ता.अहमदपूर,जि.लातूर - श्री. पवार के.बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी (तत्कालीन)-ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर-श्री. स्वामी व्ही.आर. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी (सध्याचे) विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अहमदपूर, जि.लातूर-श्री. बोंबले पि.व्ही. | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी (तत्कालीन)- विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अहमदपूर, जि.लातूर-श्री. बिराजदार ए.एन. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अंधोरी, ता. अहमदपूर, जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये ग्रामपंचायत अंधोरी या ग्रामपंचायतीची स्थापना झाल्यापासूनची विविध मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. माहितीसाठीचा अर्ज देण्याच्या वेळी अपिलार्थी यांना माहिती प्रत्यक्षात येऊन पाहून खात्री करुन घ्यावी अशी अपिलार्थीस त्यांनी विनंती केली आहे. तथापि अशाप्रकारची पाहणी झाली नाही. त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकलेल्या माहितीच्या प्रती (एकूण ५८५ पृष्ठे) त्यांनी तयार करुन सोबत आणल्या आहेत. ही माहिती त्यांनी आयोगास अवलोकनास्तव सादर केली. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळालेली नाही. त्याचप्रमाणे मूळ अर्ज व प्रथम अपील पाच व्यक्तींनी एकत्रित दाखल केल्याचे दिसून येत आहे.द्वितीय अपील अर्ज दोन व्यक्तींनी एकत्रित केले असल्याचे दिसून येत आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपात माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. जी एक महिन्यामध्ये उपलब्ध होऊ शकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती एकत्रित करुन आणलेली आहे. ती आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थी यांना विनामूल्य देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी. त्याचबरोबर उर्वरित माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांना प्रथम अपिलार्थी (श्री.डाके) व द्वितीय अपिलार्थी (श्री. चिगळे)यांना एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थींना याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरित माहितीसाठी प्रथम अपिलार्थी(श्री.डाके )व द्वितीय अपिलार्थी (श्री.चिगळे)यांना एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०७-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनायक कोंडिबा डाके, रा.अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,अंधोरी, ता.अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हाणमंत भिमराव पाटील, : अपिलार्थी
रा.हंद्राळ, ता.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,
हंद्राळ, ता.निलंगा, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,
निलंगा, जि. लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हाणमंत भिमराव पाटील व त्यांचे प्रतिनिधी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, हंद्राळ, ता.निलंगा, जि.लातूर- श्री. पी.एन.सावरगावकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -गट विकास अधिकारी,पंचायत समिती, निलंगा, जि. लातूर - श्री. उ.आ.पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा, जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २३.०२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या

अर्जान्वये सन २००५-०६ या कालावधीची ग्रामपंचायत हंद्राळसंदर्भात विविध ९ मुद्यांवर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. ही माहिती एक महिन्याच्या आत एकत्रित करणे शक्य नव्हते. तथापि तयार करुन दि. १२.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे ₹१६७६/- इतक्या शुल्काचा भरणा करावा, असे कळविले असून अपिलार्थी यांनी दि. २३.०४.२०१० रोजी शुल्काचा भरणा केला आहे व त्याबाबतच्या चलनाच्या मूळ प्रती ऐवजी झेरॉक्स प्रत त्यांना प्राप्त झाली आहे. दि. १३.०४.२०१० रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलावर सुनावणी झाली त्यावेळी शुल्काचा भरणा अपिलार्थीने करावा व तदनंतर माहिती देण्यात यावी, असा निर्णय देण्यात आला आहे.तथापि अपिलार्थी यांनी वरील चलनाची मूळ प्रत न देता झेरॉक्स प्रत दिल्यामुळे मूळ चलनाची प्रत देण्याचे अपिलार्थीस दि. २५.०७.२०१० रोजी कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थी यांनी ₹१६६७/- रकमेचा भरणा दि. २३.०४.२०१० रोजी चलनाने भरणा केलेला आहे. तथापि मूळ चलनाची प्रत त्यांच्या जवळ आहे व त्यांनी झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांना सादर केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे सांगितले की, त्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे. आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेता अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थी यांनी ₹१६६७/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे. वर नमूद केलेल्या कारणामुळे आतापर्यंत त्यांना माहिती मिळाली नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे निर्देश आहेत की, अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती द्यावी लागेल, व अपिलार्थीकडून स्वीकारलेल्या शुल्काची रक्कम ₹१६६७/- सध्याच्या व तत्कालीन ग्रामसेवकाकडून समान भागात वसूल करावी लागेल. वरील प्रमाणे दोनही जन माहिती अधिकारी अपिलार्थीस वरील रक्कम समान भागात परत करतील असे जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांना त्यांच्या स्तरावर पहावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,हंद्राळ, ता.निलंगा, जि.लातूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

२) जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा, जि. लातूर यांनी शुल्काची रक्कम ₹१६६७/- चे समान भाग करुन संबंधित सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी अपिलार्थीस परत करतील, असे व्यक्तिशः पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हाणमंत भिमराव पाटील, रा.हंद्राळ, ता.निलंगा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हंद्राळ, ता. निलंगा , जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सदाकाळे शंकर एकनाथ,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण विभाग (प्रा.),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर- श्री. विलास जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर -प्रतिनिधी- श्री. पाटील बी.एस., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १४.१२.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे एकंदर दहा मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. यामधील बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपात आहे. त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमानुसार देय असलेली माहिती दि. १०.०२.२०१० रोजीच्या

पत्राद्वारे देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना दि. ११.०२.२०१० रोजी ती मिळाली आहे. अपिलार्थी यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे, म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०२.२०१० रोजी सुनावणी घेऊन उर्वरित माहिती अर्जदारास दोन दिवसांच्या आत विनामूल्य देण्यात यावी असा निर्णय दिला. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. तदनंतर अपिलार्थीस दि. १४.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सदाकाळे शंकर एकनाथ,शिवसदन, माताजीनगर, बसवेश्वर चौक,कव्वा रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालाजी रामराव भोसले, : अपिलार्थी
रा.हाळी खु., ता.चाकूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
लोकायत शिक्षण संस्था, अहमदपूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी, :
लोकायत शिक्षण संस्था, अहमदपूर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी -श्री. बालाजी रामराव भोसले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सचिव,लोकायत शिक्षण संस्था, अहमदपूर, जि.लातूर - ॲड.पी.डी.कदम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, लोकायत शिक्षण संस्था, अहमदपूर, जि.लातूर यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या वेळी, त्यांची संस्था माहिती अधिकार अधिनियम २००५ खाली येत नाही, अशी बाजू मांडली. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय झालेला नाही,असे आयोगास अवगत केले. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी

घेऊन निर्णय घेणे आयोगास आवश्यक वाटते. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पि. क्र. ५१६८/२०१० च्या अनुषंगाने दि. २९.०३.२०११ रोजीच्या निर्णयामध्ये संस्थेच्या संदर्भात आदेश पारीत केले आहेत. त्याचप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येनुसार देय होत असलेली माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात कार्यवाही होणे आवश्यक आहे. याकरिता वरील दोनही बाबी विचारात घेऊन सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांना आयोगातर्फे या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घ्यावी लागेल. याकरिता अपिलार्थीचा मूळ अर्ज व प्रथम अपिलाच्या प्रतीसह प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, वर स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी रामराव भोसले,रा.हाळी खु.,पो.वडवळ(ना),ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,लोकायत शिक्षण संस्था, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संगमे सचिन चंद्रकांत,<br>रा. उदगीर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा),<br>जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. मोरे डी.ए.,उपशिक्षणाधिकारी (मा.),जि.प.लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २४.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास

आवश्यक वाटत आहे.त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संगमे सचिन चंद्रकांत, संगमे निवास,नोबल कॉलनी,उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पाटील यशवंत दत्तराव,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लातूर- श्री. रुपनर बी.के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा अर्ज दि. ०९.०२.२०१० रोजी त्यांच्याकडे प्राप्त झाला. सदर अर्जान्वये अपिलार्थी यांनी दि. ०१.०३.२००१ ते ३१.१२.२००९ या मोठया कालावधीची लातूर तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानाबाबतची तसेच कार्डधारकाबाबतची माहिती एकत्रित ४ मुद्यांद्वारे मागितली आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. ही माहिती फार मोठया कालावधीची व विस्तृत स्वरुपाची असल्याकारणाने त्या माहितीच्या झेरॉक्स प्रती पाठविण्याकरिता आवश्यक निधीची मागणी करण्यात आली आहे व निधी

उपलब्ध होताच माहिती उपलब्ध होईल व कार्यालयामध्ये पाहणीसाठी उपलब्ध आहे, असे दि. २३.०२.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. त्याच पत्रामध्ये आपण मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अभिलेखे पाहणीसाठी कार्यालयात उपलब्ध आहेत, असेही कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर यांनी सुनावणी घेऊन उपरोक्त बाबीची नोंद घेतली असून दि. १२.०४.२०१० रोजी अर्जदाराचा अपील अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती दिली नाही म्हणून द्वितीय अपील सादर केले आहे, असे नमूद केले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठी असल्याचे दिसून येत आहे. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(९) प्रमाणे त्यांना अभिलेखाची पाहणी देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत केल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाटील यशवंत दत्तराव,संपादक - दै. मांजराकाठ, केशवनगर, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. आर. एच.खान, | : | अपिलार्थी |
| रा.लातूर | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आर. एच.खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर- श्री. विलास जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी -श्री. पाटील बी.एस., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना प्रथमतः दि. १०.०२.२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांनी सुनावणी घेतल्यानंतर पोस्टाने दि.१२.०४.२०१० रोजी माहिती पाठविण्यात आली.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा एक संच आज उपलब्ध आहे. आयोगाने सूचना केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीचा हा संच देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आर.एच.खान,सनतनगर, एकबाल चौक, लातूर,ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/अ.प./१३९८ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. २१-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७.०१.२०११ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०६.२०११ |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन

निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कुरे बालाजी माधवराव,<br>रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>सचिव,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी,<br>बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,<br>ता.पालम, जि.परभणी | : | उत्तरवादी |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/अ.प./१३९९ | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. २१-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७.०१.२०११ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०६.२०११ |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

४. कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुरे बालाजी माधवराव, : अपीलकर्ता
रा.डिग्रस, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सचिव,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी,
बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर,
ता.पालम, जि.परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/अ.प./१४०० | |
| २ | निर्णयाची तारीख | दि. २१-०७-२०११ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ५ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७.०१.२०११ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०६.२०११ |

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारित झालेला नाही. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे (प्रथम अपिलाच्या प्रतीसह) पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुरे बालाजी माधवराव, रा.डिग्रस, पो.फरकंडा, ता.पालम, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर, ता.पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नागनाथ ग्यानबा जाधव,<br>कोर्टासमोर, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, तालुका औसा,<br>जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नागनाथ ग्यानबा जाधव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर - श्री. भंडे विठ्ठल पंढरीनाथ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, तालुका औसा,<br>जिल्हा लातूर - श्री. गुन्हाने सी. जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांनी प्रथमतः दिनांक १६-०७-२०११ रोजी नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पाठविली आहे. अपिलार्थी यांनी ही माहिती न घेतल्यामुळे ती परत आली. अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिला.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना माहिती मिळाली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाने सूचित केल्या-प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थीने ती स्विकारली. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित लिपिकाविरुध्द चौकशी सुरु केली आहे. ती प्रक्रिया त्यांनी त्वरीत पूर्ण करावी.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागनाथ ग्यानबा जाधव, कोर्टासमोर, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुर्यकांत काशीनाथ सगर,<br>मु. पो. वलांडी, तालुका देवणी, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुर्यकांत काशीनाथ सगर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना माहिती मिळाली नाही. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिलेला नाही. ही बाब विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक०९-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यकांत काशीनाथ सगर, मु. पो. वलांडी, तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कोंडीबा वैजनाथ बोमनाळे, : अपीलकर्ता

रसाळे निवास, तिरुपती सोसायटी, दूध डेअरी समोर, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,

तालुका उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९४

२ सुनावणीची तारीख दि. २१-०७-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. कोंडीबा वैजनाथ बोमनाळे : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,

तालुका उदगीर, जिल्हा लातूर

- श्रीमती उषा पुंडलीकराव बिरादार

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

- प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस., क. अधि.

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०२-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी रोजगार हमी योजने अंतर्गत सन २००७-०८, २००८-०९ व २००९-१० या कालावधीतील त्यांच्या अधिपत्याखालील ८७ ग्रामपंचायतीची विस्तृत माहिती ज्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रती, मोजमाप पुस्तिकेच्या प्रती इत्यादीचा समावेश आहे अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती विविध ग्रामपंचायतीची असल्यामुळे दिनांक ०८-०३-२०१० रोजी सर्व ग्रामपंचायतींना अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कळविले आहे व तसेच अपिलार्थीसही माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे ग्रामपंचायतीकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सर्व माहिती संकलीत करुन अपिलार्थीस द्यावी असा जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतला. त्यानुसार ८७ ग्रामपंचायतीची माहिती संकलीत करुन अपिलार्थीस दिली. अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली माहिती सुमारे ४००० पृष्ठांची आहे ही माहिती विनामूल्य पुरविण्यात आली. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली व मिळालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले आहे.

अपिलार्थी यांनी विविध ८७ ग्रामपंचायतीची माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांच्याकडे मागितली आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांना जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले असल्यामुळे अपिलार्थी यांनी अशा जन माहिती अधिका-याकडे अर्ज करणे आवश्यक आहे व ही बाब त्यांना कळविण्यात आली आहे. तथापि सर्व माहिती एकत्रित करुन त्यांना देण्यात आली आहे. ही एक विशेष कार्यवाही करण्यात आली आहे याची जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी नोंद घ्यावी व हा precedent होणार नाही असे पहावे. अपिलार्थी यांनी सुध्दा ज्या जन माहिती अधिका-याकडे माहिती आहे त्या जन माहिती अधिका-याकडे यापुढे माहिती मागवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कोंडीबा वैजनाथ बोमनाळे, रसाळे निवास, तिरुपती सोसायटी, दूध डेअरी समोर, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबुराव भिमराव सुर्यवंशी, : अपीलकर्ता
रा. खोपेगांव, पो. वासनगांव, तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाबुराव भिमराव सुर्यवंशी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर<br>- श्री. संतोष हराळे | : उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- श्री. विलास जोशी | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस., कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०९-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, दोन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १८-१२-२००९ च्या माहितीच्या अर्जान्वये सन १९९३ साली खोपेगांवच्या नागरिकांना भूकंप अनुदान देण्यात आले आहे अशा नागरिकांची नमुना नंबर ८ ची नक्कल मागितली आहे. त्यानुसार दिनांक १३-०१-२०१० रोजी नमुना नंबर ८ च्या ३२१ नकला दिलेल्या आहेत. विहित मुदतीत माहिती पुरविली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना १७५ लोकांना जे भूकंपाचे अनुदान दिले आहे त्याची यादी द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, मुद्दा क्रमांक १ च्या बद्दल संभ्रम झाल्यामुळे अशी माहिती दिली आहे.

मुद्दा क्रमांक २ व ३ हे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याशी संबंधित आहे. त्यांनी दिनांक ०५-०१-२०१० रोजी माहिती पोस्टाव्दारे पाठविली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना ही माहिती मिळाली नाही असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांना ही माहिती पुन्हा नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पाठवावी लागेल. ही माहिती प्राप्त झाल्यावर अपिलार्थी यांनी पाहणी करावी व नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुराव भिमराव सुर्यवंशी, रा. खोपेगांव, पो. वासनगांव, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सोनटक्के शिवाजी त्रिंबकराव,<br>मु. पो. लोहारा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोनटक्के शिवाजी त्रिंबकराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. सागर व्ही. व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये नोव्हेबर २००९ ते डिसेंबर २००९ व जानेवारी २०१० या महिन्यामध्ये किती सोसायट्यांनी किती साखर उचलली, लाभधारकांची यादी व साखरेचे परमीट याच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी नुकताच कार्यभार स्विकारला आहे व ते अपिलार्थीस माहिती देत आहेत. माहिती नोंदणीकृत टपालाने पाठवत आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती मिळाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२०१० रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यात यावी असा निर्णय घेतला आहे. ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे ती जन माहिती अधिकारी यांना पुरवावी लागेल.

वरील बाबी विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर यांच्याकडून अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहीत मुदतीत माहिती न देण्याचा प्रमाद घडला आहे. यासाठी त्यांना २५००० रुपये शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर सौ. गर्जे यांना २५००० रुपये शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोनटक्के शिवाजी त्रिंबकराव, मु. पो. लोहारा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी लक्ष्मणराव कोकणे, : अपीलकर्ता
रा. क्रांतीनगर, निडेबन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लिपिक, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर<br>- श्री. भाकसखेडे शेषराव गोविंदराव | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर,<br>जिल्हा लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी लक्ष्मणराव कोकणे, रा. क्रांतीनगर, निडेबन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख महुमंद खुर्रम अ. रशिदसाब,<br>छोटी मस्जिद जवळ, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख महुमंद खुर्रम अ. रशिदसाब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२०१० |

